# प्रेसनोट

दि.३०/११/२०२२

## गुन्हे शाखा युनिट क्रमांक ३, पुणे शहर येथील पोलीस अंमलदार व खाजगी इसमावर लाच स्वीकारले प्रकरणी कारवाई

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
|---|---|
| गुन्हा नोंद क्रमांक | खडकी पोलीस स्टेशन, पुणे शहर गु.र.नं. ३०८/२०२२ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम कलम – ७, ७ अ, १२ |
| तक्रारदार | पुरुष, वय - ३० वर्षे |
| आरोपीचे नाव व कार्यालय | १. लोकसेवक - दिपक प्रल्हाद क्षीरसागर, वय - ३४ वर्षे, पद - पोलीस शिपाई, नेमणुक गुन्हे शाखा,युनिट क्रमांक ३, पुणे शहर<br>२. सिमोन अविनाश साळवी, वय - २७ वर्षे, (खाजगी इसम)<br>दोघांना अटक करण्यात आलेले आहे. |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | २,००,०००/- (दोन लाख रूपये) |
| स्वीकारलेली लाच रक्कम | ३०,०००/- ( तीस हजार रूपये) |

पडताळणी व सापळा दिनांक :- दि. २९/११/२०२२

सापळा ठिकाण :- गुन्हे शाखा युनिट ३ कार्यालय, खडकी

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदार यांचे भावाचे मोबाईल खरेदी - विक्री व दुरूस्तीचे दुकान आहे. त्यांनी चोरीचे मोबाईल खरेदी केले म्हणून मोबाईल चोरीच्या गुन्हयात आरोपी न करणे व अटक न करणे यासाठी लोकसेवक पोलीस अंमलदार क्षीरसागर यानी २,००,०००/- रूपये लाचेची मागणी केल्याची तक्रार ला.प्र.वि. पुणे येथे दिली.

सदर तक्रारीची पडताळणी केली असता लोकसेवक - पोलीस अंमलदार क्षीरसागर याने तक्रारदार याचेकडे प्रथमतः २,००,०००/- रूपये लाचेची मागणी केली व त्यापैकी ४०,०००/- रूपये लगेचच आणुन देण्यास सांगीतले असता सापळा कारवाई दरम्यान त्यापैकी ३०,०००/- रूपये आरोपी क्र. २ साळवी याचेकरवी स्वीकारल्यावर त्या दोघांना ताब्यात घेण्यात आले असून वरिलप्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

ला.प्र.वि. पुणे युनिटचे पोलीस निरीक्षक प्रविण निंबाळकर तपास करत आहेत.

सदरची कारवाई मा.पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. अमोल तांबे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. सुरज गुरव, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

शासकीय अधिकारी, कर्मचारी / लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमूद क्रमांकवर सपर्क साधण्याचे आवाहन श्री. अमोल तांबे, पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे यांनी केले आहे.

३. हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४
४. ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
५. व्हॉट्स-ॲप क्रमांक पुणे – ७८७५३३३३३३
६. व्हॉट्स-ॲप क्रमांक मुंबई – ९९३०९९७७००
७. ई-मेलआयडी - पुणे dyspacbpune@mahapolice.gov.in
८. वेबसाईट - www.acbmaharashtra.gov.in
७. ऑनलाईन ॲप तक्रार - www.acbmaharashtra.net.in

(श्रीहरी पाटील)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे.